MHST090009792013

## नि.दि.दा.क्र. २१३/२०१३ मधील निशाणी क्र. १६५ वरील आदेश

प्रतिवादी क्र.१ ने प्रस्तुतचा अर्ज त्यांचे विरुद्ध झालेला युक्तीवाद नाहीचा आदेश रद्द करण्यात येवून त्यांना तुर्तातुर्त ताकीद अर्जावर युक्तीवाद करण्याची परवानगी मिळण्यासाठी दाखल केला आहे.

२. अर्ज व नि.क्र. १७० ला असलेले म्हणणे अवलोकन केले. वादी व प्रतिवादीतर्फे विद्वान विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

३. प्रतिवादीने असे कथन केले आहे की, त्याने वेळेत युक्तीवाद न केल्याने त्याच्या विरुद्ध युक्तीवाद नाहीचा आदेश पारित करण्यात आला. प्रतिवादी क्र.१ याची तुर्तातुर्त ताकीद अर्जावर युक्तीवाद करण्याची तयारी होती व आहे. परंतु त्याची कैफियत दाखल होणेची राहिलेली आहे. या तांत्रिक अडचणीमुळे त्याला युक्तीवाद करता येत नाही. त्यामुळे, त्याने सदरचा अर्ज मंजूर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

४. वादींनी सदर अर्जावर म्हणणे देवून अर्जातील कथने त्यांना मान्य व कबूल नसल्याचे कथन केले आहे. त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, प्रस्तुतचा दावा चौकशीस लागलेनंतर प्रतिवादीने नि.नं.१५० ला तुर्तातुर्त ताकीद अर्ज दिला. सदर अर्ज प्रतिवादीने वादी व प्रतिवादी नं. ७ व ८ यांचेविरुद्ध दिला. त्यावर वादी यांनी ता. ०६/०७/२०२३ रोजी म्हणणे दाखल केले. त्यानंतर प्रतिवादीने सदर अर्जाची नोटीस प्रतिवादी नं. ७ व ८ यांचेवर

बजावणी करणेसाठी अनेक तारखा कोणतीही तजवीज केली नाही. त्यानंतर वादीने मे. कोर्टास सदर बाब लक्षात आणून दिल्यानंतर प्रतिवादीने त्याबाबत तजवीज केली व प्रतिवादी नं. ७ व ८ यांना नि. नं. १५० चे अर्जाची नोटीस काढणेत आली. सदर प्रतिवादी नं. ७ व ८ यांनी त्यांचे नि. नं. १५० वरील म्हणणे ता. १४/१२/२०२३ रोजी दाखल केले. तेव्हापासून प्रस्तुत दावा नि. नं. १५० चे युक्तीवादावर नेमणेत आलेला आहे. त्यानंतर प्रस्तुतकामी अनेक तारखांना प्रतिवादीने युक्तीवाद न केलेने ता. १६/०७/२०२४ रोजी त्याचेविरुद्ध युक्तीवाद नाहीचा आदेश पारीत झालेला आहे. त्यानंतरही चार तारखा झाल्यानंतर प्रतिवादीने दि. २०/०८/२०२४ रोजी सदरचा नि. नं. १६५ चा अर्ज दिलेला आहे. यावरुनच प्रतिवादी हा प्रस्तुतचा अर्ज व दाव्याचे कामी बेजबाबदार असलेचे दिसुन येते. प्रतिवादीचे सदरचे कृत्य पुर्णपणे बेकायदेशीर आहे. सबब प्रतिवादीचा अर्ज कायद्याने चालु शकत नसलेने खर्चासह फेटाळणेत यावा अशी त्यांनी विनंती केली आहे.

५. प्रस्तुत अर्ज व म्हणणे याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रतिवादी क्र.७ व ८ यांचे नि.क्र.१५० वर म्हणणे आल्यानंतर देखील जवळपास ७ महिने प्रतिवादी क्र.१ याने सदर अर्जावर युक्तीवाद केला नाही. तसेच, युक्तीवाद नाहीचा आदेश पारित झाल्यानंतर देखील प्रस्तुतचा अर्ज दाखल करण्यास प्रतिवादीस जवळपास एक महिन्याचा विलंब झालेला आहे. त्यामुळे इतक्या जुन्या प्रकरणामध्ये प्रतिवादीची ही वर्तणूक योग्य नाही. परंतु, नैसर्गिक न्यायतत्वाचा विचार केला असता प्रतिवादीस एक संधी देणे योग्य व न्यायोचित राहिल असे मला वाटते. सबब, प्रस्तूतचा अर्ज जास्तीत जास्त खर्चासह मंजूर होणेस पात्र आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे :

# आदेश

१. अर्ज खर्चासह मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादीने पुढील तारखेपर्यंत रक्कम रुपये १०००/- वादींना दयावे.

३. वर नमूद खर्चाची रक्कम जमा केल्यानंतर प्रतिवादीविरुद्ध युक्तीवाद नाहीचा आदेश रद्द करण्यात येतो.

ANKUSH ATMARAM PACHARNE

Digitally signed by ANKUSH ATMARAM PACHARNE
Date: 2024.09.19 12:33:52 +0530

स्थळ : कोरेगाव ( ए.ए.पाचरणे )

दिनांक : १०/०९/२०२४ सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर कोरेगाव.